22 AUG 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महामानवांच्या सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत : डॉ. सबनीस

कोल्हापूर, ता. २१ : 'भारत हा कोणत्याही एका महामानवाचा, धर्माचा किंवा विचार परंपरेचा नाही. बुद्ध, महावीर, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, महात्मा गांधी, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णा भाऊ साठे अशा सर्व महामानवांच्या मानवतावादी सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत आहे', असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आज केले.

पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात झालेल्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांना 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार', तर ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर आणि ज्येष्ठ पत्रकार डॉ. संजय थोरात यांना 'लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार' प्रदान करण्यात आला.


कोल्हापूर : पुरस्कार वितरणप्रसंगी डॉ. आर. के. कामत, डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. पांडुरंग भोसले, रणधीर शिंदे, डॉ. एन. डी. जत्राटकर, महेंद्र भारती, संजय थोरात आदी.

मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, 'बाबा भारती यांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत पाली भाषा, बौद्ध वाङ्मय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आयुष्यभर केलेले कार्य अतुलनीय आहे.'

डॉ. कामत म्हणाले, 'बाबा भारती यांच्या नावाने मिळालेला हा जीवनगौरव सन्मान कृतज्ञतेने स्वीकारत असून, विद्यापीठाच्या सामाजिक बांधिलकीला अधिक सक्षमपणे पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील राहू.'

डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. थोरात, जत्राटकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, हरीष भालेराव, डी. जी. भास्कर, किसनराव कुराडे, जी. बी. अंबपकर आदी उपस्थित होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी आभार मानले.

## 'पाली अभ्यासक्रमा'ला बाबा भारतींचे नाव द्या

■ शिवाजी विद्यापीठातील पाली भाषेच्या अभ्यासक्रमाला बाबा भारतींचे नाव देण्याबाबत विचार व्हावा, अशी अपेक्षा डॉ. सबनीस यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 AUG 2026
जनप्रवास

# सर्व महामानवांच्या सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत

## डॉ. श्रीपाल सबनीस : कुलगुरू कामत यांना 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव' पुरस्कार प्रदान



कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव' पुरस्कार प्रदान करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस. सोबत (डावीकडून) डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. एन.डी. जत्राटकर, महेंद्र भारती, डॉ. संजय थोरात आणि डॉ. जत्राटकर.

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारत हा कोणत्याही एका महामानवाचा, एका धर्माचा किंवा एका विचारपरंपरेचा नाही. बुद्ध, महावीर, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, महात्मा गांधी, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णाभाऊ साठे अशा सर्व महामानवांच्या मानवतावादी सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे येथील शाहू स्मारक भवनात आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार' आणि ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन.डी. जत्राटकर आणि ज्येष्ठ पत्रकार, लेखक डॉ. संजय थोरात यांना 'लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

डॉ. सबनीस म्हणाले, भारतीय संस्कृतीची निर्मिती केवळ एका जातीत, धर्मात किंवा अभिजन-बहुजनांच्या कोणत्याही एका समूहात झालेली नाही. सर्व जाती-धर्म, आदिवासी समाज, अभिजनांचे ज्ञान, बहुजनांचे श्रम आणि सामान्य माणसाचे योगदान यांतून भारतीय संस्कृती घडली आहे. त्यामुळे कोणत्याही एका विचाराला वगळून भारताचा समग्र विचार करता येणार नाही.

'कुलगुरूंना बाबा भारती पुरस्कार मिळणे विशेष आनंदाचे'

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष आनंद व्यक्त करताना डॉ. सबनीस म्हणाले, "अनेक वर्षांत अनेक पुरस्कार दिले; मात्र एका कुलगुरूंना बाबा भारतींच्या नावाचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करताना मला विशेष धन्यता वाटते. डॉ. कामत यांच्या मनोगतात जातिधर्मभेदापेक्षा ज्ञानाला दिलेले महत्त्व स्पष्टपणे जाणवते. शिवाजी, ज्ञानेश्वर आणि बुद्ध यांच्या विचारांचा समन्वय 'करणारे कुलगुरू म्हणून डॉ. कामत यांची भूमिका उल्लेखनीय असल्याचे सांगितले.

यावेळी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव करताना विचार मांडले.

पुरस्काराला उत्तर देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी लोकशिक्षक बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव करताना, पाली-मराठी शब्दकोशाच्या माध्यमातून त्यांनी बुद्धांचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे अतुलनीय कार्य केले असल्याचे सांगितले. हा शब्दकोश केवळ शब्दांचा संग्रह नसून ज्ञानाचे लोकशाहीकरण करणारा आणि सामान्य माणसाला मूळ बुद्धविचारांशी जोडणारा महत्त्वपूर्ण सेतू असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रमुख अतिथी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह पुरस्कारप्राप्त डॉ. एन.डी. जत्राटकर आणि डॉ. संजय थोरात यांनीही मनोगते व्यक्त केली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. हरिष भालेराव, डी.जी. भास्कर, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. जी.बी. अंबपकर, अनिल म्हमाणे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. मानसिंग टाकळे आदी उपस्थित होते.

22 AUG 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज अँड व्ह्यूज

वामाक्षी


# सर्व महामानवांच्या सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत : डॉ. श्रीपाल सबनीस

कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :

भारत हा कोणत्याही एका महामानवाचा, एका धर्माचा किंवा एका विचारपरंपरेचा नाही. बुद्ध, महावीर, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, महात्मा गांधी, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णाभाऊ साठे अशा सर्व महामानवांच्या मानवतावादी सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आज केले.

पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे येथील शाहू स्मारक भवनात आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार' आणि ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन.डी. जत्राटकर आणि ज्येष्ठ पत्रकार, लेखक डॉ. संजय थोरात यांना 'लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

डॉ. सबनीस म्हणाले, भारतीय संस्कृतीची निर्मिती केवळ एका जातीत, धर्मात किंवा अभिजन-बहुजनांच्या कोणत्याही एका समूहात झालेली नाही. सर्व जाती-धर्म, आदिवासी समाज, अभिजनांचे ज्ञान, बहुजनांचे श्रम आणि सामान्य माणसाचे योगदान यांतून भारतीय संस्कृती घडली आहे. त्यामुळे कोणत्याही एका विचाराला वगळून भारताचा समग्र विचार करता येणार नाही.

बाबा भारती हे समन्वय, समता आणि संवादाचे प्रतीक

बाबा भारती यांच्या विचारांचे विवेचन करताना डॉ. सबनीस म्हणाले, बाबा भारती बौद्ध विचारांशी निष्ठावान असले तरी एका धर्माच्या चौकटीत अडकले नाहीत. बुद्ध धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्सवाद, गांधीवादी विचार यांसह विविध ज्ञानपरंपरांचा त्यांनी चिकित्सक अभ्यास केला. विविध विचारांमधील मानवकल्याणकारी मूल्यांचा समन्वय साधणे ही त्यांची भूमिका होती. लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानने त्यांची हीच समन्वयवादी भूमिका पुढे नेत विविध जातिधर्मांतील आणि सामाजिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या मानवतावादी दृष्टीच्या व्यक्तीमत्त्वांचा गौरव केला आहे, ही अभिमानाची बाब आहे.

'कुलगुरूंना बाबा भारती पुरस्कार मिळणे विशेष आनंदाचे'

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष आनंद व्यक्त करताना डॉ. सबनीस म्हणाले, "अनेक वर्षांत अनेक पुरस्कार दिले; मात्र एका कुलगुरूंना बाबा भारतींच्या नावाचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करताना मला विशेष धन्यता वाटते. डॉ. कामत यांच्या मनोगतात जातिधर्मभेदापेक्षा ज्ञानाला दिलेले महत्त्व स्पष्टपणे जाणवते. शिवाजी, ज्ञानेश्वर आणि बुद्ध यांच्या विचारांचा समन्वय करणारे कुलगुरू म्हणून डॉ. कामत यांची भूमिका उल्लेखनीय असल्याचे सांगितले.



शिवाजी विद्यापीठातील पाली भाषेच्या अभ्यासक्रमाला बाबा भारतींचे नाव देण्याबाबत विचार व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव करताना, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत त्यांनी पाली भाषा, बौद्ध वाङ्मय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आयुष्यभर केलेले कार्य अतुलनीय असल्याचे सांगितले. १९८७ मध्ये प्रकाशित झालेला सुमारे २५ हजार शब्दांचा पाली-मराठी शब्दकोश हे त्यांच्या कार्याचे शिखर असून, पाली भाषेचा आणि बौद्ध वाङ्मयाचा विस्मृतीत गेलेला समृद्ध वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले, असे त्यांनी नमूद केले. कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या शैक्षणिक नेतृत्वाचा उल्लेख करताना, संशोधन, तंत्रज्ञान, डिजिटल युगातील आव्हाने आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या संक्रमणकाळात त्यांनी विविध महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थांचे नेतृत्व केले असून शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञान, संशोधन व शिक्षणाच्या समृद्ध परंपरेला आधुनिक काळात पुढे नेण्याचे कार्य ते करीत असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले. चांगला शिक्षक, संशोधक, विचारवंत आणि लेखक आपल्या कार्याचा गंध दीर्घकाळ समाजात टिकवून ठेवतो आणि अशा कर्तृत्वाची स्मृती जिवंत ठेवण्याचे काम पुरस्कारांच्या माध्यमातून होते, असेही त्यांनी नमूद केले.

पुरस्काराला उत्तर देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी लोकशिक्षक बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव करताना, पाली-मराठी शब्दकोशाच्या माध्यमातून त्यांनी बुद्धांचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे अतुलनीय कार्य केले असल्याचे सांगितले. हा शब्दकोश केवळ शब्दांचा संग्रह नसून ज्ञानाचे लोकशाहीकरण करणारा आणि सामान्य माणसाला मूळ बुद्धविचारांशी जोडणारा महत्त्वपूर्ण सेतू असल्याचे त्यांनी नमूद केले. ज्ञान हे विद्यापीठे आणि ग्रंथालयांच्या चौकटीत मर्यादित न राहता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, हीच लोकशिक्षकाची खरी भूमिका असल्याचे स्पष्ट करत त्यांनी शिक्षकापेक्षा लोकशिक्षक बनण्याचे मोठे सामाजिक दायित्व अधोरेखित केले. नव्या पिढीशी केवळ वर्गखोल्यांतून नव्हे, तर त्यांच्या मनाशी व हृदयाशी संवाद साधत ज्ञानाचा वारसा पुढे नेण्याची आवश्यकता व्यक्त करत, बाबा भारती यांच्या नावाने मिळालेला हा जीवनगौरव सन्मान आपण कृतज्ञतेने स्वीकारत असून शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक बांधिलकीला अधिक सक्षमपणे पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील राहू, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी प्रमुख अतिथी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह पुरस्कारप्राप्त डॉ. एन.डी. जत्राटकर आणि डॉ. संजय थोरात यांनीही मनोगते व्यक्त केली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. हरिष भालेराव, डी.जी. भास्कर, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. जी.बी. अंबपकर, अनिल म्हमाणे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. मानसिंग टाकळे यांच्यासह शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरुषोत्तम सदाफुले, विनायक ढोंबरे, अजित पाटील, मल्हार जोशी, आनंदा कांबळे, प्रकाश कांबळे, सचिन कांबळे, आर.के. कांबळे, आप्पा देशमुख, विजय कांबळे, हंबीरराव पाटील, रमेश ढाले, रविंद्र भारती, निमिष भारती, शार्दूल भारती, जय भारती, अमोल ढाले, राजरत्न गाडे आणि अभिजीत भोसले यांनी संयोजन केले.

22 AUG 2026

प्रभात

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्व महामानवांच्या सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत - डॉ. श्रीपाल सबनीस

ईश्वरपूर, दि. २३ (प्रतिनिधी) - भारत हा कोणत्याही एका महामानवाचा, एका धर्माचा किंवा एका विचारपरंपरेचा नाही. बुद्ध, महावीर, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, महात्मा गांधी, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णाभाऊ साठे अशा सर्व महामानवांच्या मानवतावादी सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

येथील शाहू स्मारक भवनात लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते.



ईश्वरपूर : कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना पुरस्कार प्रदान करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस. समवेत डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. रणधीर शिंदे व इतर. (छाया : सिद्धार्थ कांबळे)

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार, ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर, लेखक डॉ. संजय थोरात यांना शिक्षक प्रतिभा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, बाबा भारती बौद्ध विचारांशी निष्ठावान असले तरी एका धर्माच्या चौकटीत अडकले नाहीत. बुद्ध धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्सवाद, गांधीवादी विचार यांसह विविध ज्ञानपरंपरांचा त्यांनी चिकित्सक अभ्यास केला.

यावेळी डॉ. राजनीश कामत, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. एन. डी.जत्राटकर, डॉ. संजय थोरात यांनी मनोगते व्यक्त केली. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. हरिष भालेराव, डी. जी. भास्कर, डॉ.किसनराव कुराडे, डॉ. जी. बी. अंबपकर, अनिल म्हमाणे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. मानसिंग टाकळे उपस्थित होते. पुरुषोत्तम सदाफुले, विनायक ठोंबरे, अजित पाटील, मल्हार जोशी, आनंदा कांबळे, प्रकाश कांबळे, सचिन कांबळे, आर. के. कांबळे, आप्पा देशमुख, विजय कांबळे, हंबीरराव पाटील, रमेश ढाले, रविंद्र भारती, निमिष भारती यांनी संयोजन केले.

लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सर्व महामानवांच्या सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत : डॉ.श्रीपाल सबनीस

■ बंधुता न्यूज नेटवर्क

ईश्वरपूर : भारत हा कोणत्याही एका महामानवाचा, एका धर्माचा किंवा एका विचारपरंपरेचा नाही. बुद्ध, महावीर, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, महात्मा गांधी, आगरकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णाभाऊ साठे अशा सर्व महामानवांच्या मानवतावादी सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ.श्रीपाल सबनीस यांनी केले.

लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे येथील शाहू स्मारक भवनात आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.राजनीश कामत यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार, ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ.एन.डी. जत्राटकर, लेखक डॉ. संजय थोरात यांना शिक्षक प्रतिभा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ.सबनीस म्हणाले, बाबा भारती बौद्ध विचारांशी निष्ठावान असले तरी एका धर्माच्या चौकटीत अडकले नाहीत. बुद्ध धम्म, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मार्क्सवाद, गांधीवादी विचार



यांसह विविध ज्ञानपरंपरांचा त्यांनी चिकित्सक अभ्यास केला. डॉ.राजनीश कामत, डॉ.रणधीर शिंदे, डॉ.आलोक जत्राटकर, डॉ.एन.डी.जत्राटकर, डॉ.संजय थोरात यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ.हरिष भालेराव, डी.जी. भास्कर, डॉ.किसनराव कुराडे, डॉ.जी.बी. अंबपकर, अनिल म्हमाणे, डॉ.कैलास सोनवणे, डॉ.प्रभंजन माने, डॉ.मानसिंग टाकळे उपस्थित होते. पुरूषोत्तम सदाफुले, विनायक ठोंबरे, अजित पाटील, मल्हार जोशी, आनंदा कांबळे, प्रकाश कांबळे, सचिन कांबळे, आर.के. कांबळे, आप्पा देशमुख, विजय कांबळे, हंबीरराव पाटील, रमेश ढाले, रविंद्र भारती, निमिष भारती यांनी संयोजन केले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले.

2 2 AUG 2026

वातम्यांचा राजा
जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारत देश हा सर्व महामानवांच्या सामर्थ्यांची बेरीज

## डॉ. श्रीपाल सबनीस : पुरस्कार वितरण समारंभ उत्साहात

जनप्रवास । ईश्वरपूर

भारत हा कोणत्याही एका महामानवाचा, एका धर्मांचा किंवा एका विचारपरंपरेचा नाही. बुद्ध, महावीर, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, महात्मा गांधी, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णा भाऊ साठे अशा सर्व महामानवांच्या मानवतावादी सामर्थ्यांची बेरीज म्हणजे भारत आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे येथील शाहू स्मारक भवनात आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार' आणि ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर आणि ज्येष्ठ पत्रकार, लेखक डॉ. संजय थोरात यांना 'लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. डॉ. सबनीस म्हणाले, भारतीय संस्कृतीची निर्मिती केवळ एका जातीत, धर्मात किंवा अभिजन-बहुजनांच्या कोणत्याही एका समूहात झालेली नाही. सर्व जाती-धर्म, आदिवासी समाज, अभिजनांचे ज्ञान, बहुजनांचे श्रम आणि सामान्य माणसाचे योगदान यांतून भारतीय संस्कृती घडली आहे. त्यामुळे कोणत्याही एका विचाराला वगळून भारताचा समग्र विचार करता येणार नाही. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कुलगुरू डॉ. कामत यांनी लोकशिक्षक बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव केला. प्रमुख अतिथी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह पुरस्कारप्राप्त डॉ. एन. डी. जत्राटकर आणि डॉ. संजय थोरात यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. हरिप भालेराव, डी. जी. भास्कर, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. जी. बी. अंबपकर, अनिल म्हमाणे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. मानसिंग टाकळे उपस्थित होते. पुरुषोत्तम सदाफुले, विनायक ठोंबरे, अजित पाटील, मल्हार जोशी, आनंदा कांबळे, प्रकाश कांबळे, सचिन कांबळे, आर. के. कांबळे, आप्पा देशमुख, विजय कांबळे, हंबीरराव पाटील, रमेश ढाले, रवींद्र भारती, निमिष भारती, शार्दूल भारती, जय भारती, अमोल ढाले, राजरत्न गाडे आणि अभिजीत भोसले यांनी संयोजन केले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.राजनीश कामत यांना 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव' पुरस्कार प्रदान करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ.श्रीपाल सबनीस. सोबत (डावीकडून) डॉ. पांडुरंग भोसले, डॉ.रणधीर शिंदे, डॉ. एन. डी. जत्राटकर, महेंद्र भारती, डॉ. संजय थोरात आणि डॉ. आलोक जत्राटकर.

### बाबा भारती हे समन्वय, समता आणि संवादाचे प्रतीक

बाबा भारती यांच्या विचारांचे विवेचन करताना डॉ.सबनीस म्हणाले, बाबा भारती बौद्ध विचारांशी निष्ठावान असले तरी एका धर्मांच्या चौकटीत अडकले नाहीत. बुद्ध धम्म, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मार्क्सवाद, गांधीवादी विचार यांसह विविध ज्ञानपरंपरांचा त्यांनी चिकित्सक अभ्यास केला. विविध विचारांमधील मानवकल्याणकारी मूल्यांचा समन्वय साधणे ही त्यांची भूमिका होती. लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानने त्यांची हीच समन्वयवादी भूमिका पुढे नेत विविध जातिधर्मांतील आणि सामाजिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या मानवतावादी दृष्टीच्या व्यक्तीमत्त्वांचा गौरव केला आहे, ही अभिमानाची बाब आहे.

26, 3:47 PM IMG-20260824-WA0004.jpg

22 AUG 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





# वार्ता सम्राट

संपादक : प्रकाश कांबळे (लिंगनूरकर)

Postal Reg.No.KLP-346/2026-2028 RNI No.MAHMAR/2016/72710 email :vartasamrat@gmail.com

* वर्ष १० वे * अंक ४१ वा *शनिवार दि. २२ ऑगस्ट २०२६ * पृष्ठ ४ * किंमत ५ रूपये *


# लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठाणच्या वतीने पुरस्कार वितरण कार्यक्रम संपन्न

## सर्व महामानवांच्या सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत: डॉ. श्रीपाल सबनीस

कोल्हापूर/प्रतिनिधी :

भारत हा कोणत्याही एका महामानवाचा, एका धर्माचा किंवा एका विचारपरंपरेचा नाही. बुद्ध, महावीर, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, महात्मा गांधी, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अशा सर्व महामानवांच्या मानवतावादी सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार प्रदान करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस. सोबत (डावीकडून) डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. एन.डी. जत्राटकर, महेंद्र भारती, डॉ. संजय थोरात आणि डॉ. आलोक जत्राटकर.

पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे राजर्षी शाहू स्मारक भवनात आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार व ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन.डी. जत्राटकर आणि ज्येष्ठ पत्रकार, लेखक डॉ. संजय थोरात यांना लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी बोलताना डॉ. सबनीस म्हणाले, भारतीय संस्कृतीची निर्मिती केवळ एका जातीत, धर्मात किंवा अभिजन-बहुजनांच्या कोणत्याही एका समूहात झालेली नाही. सर्व जाती-धर्म, आदिवासी समाज, अभिजनांचे ज्ञान, बहुजनांचे श्रम आणि सामान्य माणसाचे योगदान यांतून भारतीय संस्कृती घडली आहे. त्यामुळे कोणत्याही एका विचाराला वगळून भारताचा समग्र विचार करता येणार नाही.

बाबा भारती यांच्या विचारांचे विवेचन करताना डॉ. सबनीस म्हणाले, बाबा भारती बौद्ध विचारांशी निष्ठावान असले तरी एका धर्माच्या चौकटीत अडकले नाहीत. बुद्ध धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्सवाद, गांधीवादी विचार यांसह विविध ज्ञानपरंपरांचा त्यांनी चिकित्सक अभ्यास केला. विविध विचारांमधील मानव कल्याणकारी मूल्यांचा समन्वय साधणे ही त्यांची भूमिका होती. लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानने त्यांची हीच समन्वयवादी भूमिका पुढे नेत विविध जातिधर्मांतील आणि सामाजिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या मानवतावादी दृष्टीच्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव केला आहे, ही अभिमानाची बाब आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष आनंद व्यक्त करताना डॉ. सबनीस म्हणाले, अनेक वर्षांत अनेक पुरस्कार दिले; मात्र एका कुलगुरूंना बाबा भारतींच्या नावाचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करताना मला विशेष धन्यता वाटते. डॉ. कामत यांच्या मनोगतात जातिधर्मभेदापेक्षा ज्ञानाला दिलेले महत्त्व स्पष्टपणे जाणवते. शिवाजी, ज्ञानेश्वर आणि बुद्ध यांच्या विचारांचा समन्वय करणारे कुलगुरू म्हणून डॉ. कामत यांची भूमिका उल्लेखनीय असल्याचे सांगितले.

यावेळी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव करताना, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत त्यांनी पाली भाषा, बौद्ध वाङ:मय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आयुष्यभर केलेले कार्य अतुलनीय असल्याचे सांगितले. १९८७ मध्ये प्रकाशित झालेला सुमारे २५ हजार शब्दांचा पाली-मराठी शब्दकोश हे त्यांच्या कार्याचे शिखर असून, पाली भाषेचा आणि बौद्ध वाङ;मयाचा विस्मृतीत गेलेला समृद्ध वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

पुरस्काराला उत्तर देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी लोकशिक्षक बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव करताना, पाली-मराठी शब्दकोशाच्या माध्यमातून त्यांनी बुद्धांचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे अतुलनीय कार्य केले असल्याचे सांगितले. हा शब्दकोश केवळ शब्दांचा संग्रह नसून ज्ञानाचे लोकशाहीकरण करणारा आणि सामान्य माणसाला मूळ बुद्धविचारांशी जोडणारा महत्त्वपूर्ण सेतू असल्याचे त्यांनी नमूद केले. ज्ञान हे विद्यापीठे आणि ग्रंथालयांच्या चौकटीत मर्यादित न राहता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, हीच लोकशिक्षकाची खरी भूमिका असल्याचे स्पष्ट करत त्यांनी शिक्षकापेक्षा लोकशिक्षक बनण्याचे मोठे सामाजिक दायित्व अधोरेखित केले. नव्या पिढीशी केवळ वर्गखोल्यांतून नव्हे, तर त्यांच्या मनाशी व हृदयाशी संवाद साधत ज्ञानाचा वारसा पुढे नेण्याची आवश्यकता व्यक्त करत, बाबा भारती यांच्या नावाने मिळालेला हा जीवनगौरव सन्मान आपण कृतज्ञतेने स्वीकारत असून शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक बांधिलकीला अधिक सक्षमपणे पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील राहू अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

पुरस्कारप्राप्त डॉ.एन.डी. जत्राटकर म्हणाले, बाबा भारती हे प्रगल्भ बुध्दीमत्ता असलेले व तथागत गौतम बुध्द आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रति प्रचंड निष्ठा असलेले व्यक्तीमत्व होते. त्यांनी धम्म कार्याला पूर्णपणे वाहून घेतले होते. त्यांनी धम्मपद, बौध्द संस्कार विधी, माठी-पाली शब्दकोश असे त्यांचे पाच ग्रंथ प्रकाशित आहेत. अशा सुसंस्कृत, प्रतिभावंत व्यक्तीच्या नावाचा पुरस्कार मिळणे ही आल्यासाठी मोठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्रमुख अतिथी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह पुरस्कारप्राप्त डॉ. संजय थोरात यांनीही मनोगते व्यक्त केली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. हरिष भालेराव, डी.जी. भास्कर, डॉ. किसनराव कुराडे, डॉ.जी.बी.अंबपकर, अनिल म्हमाणे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ.पी. एस. कांबळे, डॉ.प्रभंजन माने, डॉ.मानसिंग टाकळे यांच्यासह शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन पुरुषोत्तम सदाफुले, विनायक ठोंबरे, अजित पाटील, मल्हार जोशी, आनंदा कांबळे, प्रकाश कांबळे, सचिन कांबळे, आर.के. कांबळे, आप्पा देशमुख, विजय कांबळे, हंबीरराव पाटील, रमेश ढाले, रविंद्र भारती, निमिष भारती, शार्दूल भारती, जय भारती, अमोल ढाले, राजरत्न गाडे आणि अभिजीत भोसले यांनी केले.

### विद्यापीठातील पाली भाषेच्या अभ्यासक्रमाला बाबा भारतींचे नाव देण्याची मागणी

बाबा भारती यांनी मराठी-पाली भाषेचा शब्दकोश तयार करण्याचे मोठे कार्य केले असल्याने शिवाजी विद्यापीठातील पाली भाषेच्या अभ्यासक्रमाला बाबा भारतींचे नाव देण्याबाबत विचार व्हावा, अशी अपेक्षा डॉ.श्रीपाल सबनीस यांनी कुलगुरू डॉ कामत यांच्याकडे व्यक्त केली.

22 AUG 2026

पुण्यनगरी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्व महामानवांच्या सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत

## डॉ. श्रीपाल सबनीस : कुलगुरू डॉ. कामत यांना जीवन गौरव पुरस्कार



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना पुरस्कार प्रदान करताना डॉ. श्रीपाल सबनीस. सोबत मान्यवर.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारत हा कोणत्याही एका महामानवाचा, एका धर्माचा किंवा एका विचारपरंपरेचा नाही. बुद्ध, महावीर, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, महात्मा गांधी, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णाभाऊ साठे अशा सर्व महामानवांच्या मानवतावादी सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत आहे, असे प्रतिपादन अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे येथील शाहू स्मारक भवनात आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना 'लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार' आणि ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर, लेखक डॉ. संजय थोरात यांना 'लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

पुरस्काराला उत्तर देताना कुलगुरू डॉ. कामत यांनी लोकशिक्षक बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव करताना, पाली-मराठी शब्दकोशाच्या माध्यमातून त्यांनी बुद्धांचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे अतुलनीय कार्य केले असल्याचे सांगितले.

यावेळी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, प्रमुख अतिथी डॉ. आलोक जत्राटकर आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांनी प्रास्ताविक, प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी आभार मानले.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. हरिष भालेराव, डी. जी. भास्कर, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. जी. बी. अंबपकर, अनिल म्हमाणे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. मानसिंग टाकळे आदी उपस्थित होते. पुरुषोत्तम सदाफुले, विनायक ठोंबरे, अजित पाटील, मल्हार जोशी, आनंदा कांबळे, प्रकाश कांबळे, सचिन कांबळे, आर. के. कांबळे, आप्पा देशमुख, विजय कांबळे, हंबीरराव पाटील, रमेश ढाले, रवींद्र भारती, निमिष भारती, शार्दूल भारती, जय भारती, अमोल ढाले, राजरत्न गाडे आणि अभिजित भोसले यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 AUG 2026
सकाळ

# नावीन्यपूर्ण उपक्रमांतून कॉलेजचे वेगळेपण जपा

## कामत : नाईट कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत आणि उच्च शिक्षण कोल्हापूर विभागाचे सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्सला भेट दिली. त्यांनी कॉलेजच्या कामकाजाची पाहणी केली. केवळ कार्यालयीन आढावा न घेता त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांच्या अडचणी, शिक्षणाचा अनुभव आणि त्यांच्या अपेक्षा जाणून घेत कुलगुरू डॉ. कामत आणि सहसंचालक डॉ. बच्छाव यांनी कॉलेजच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली. यानंतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसोबत सहविचार सभा घेतली. यावेळी प्राचार्य डॉ. उत्तम पाटील यांनी स्वागत केले.

कुलगुरू डॉ. कामत यांनी रोजगार, व्यवसाय किंवा अन्य कारणांमुळे दिवसा व्यग्र असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली ठेवणे, ही या महाविद्यालयाची महत्त्वाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. बच्छाव यांनी बदलत्या शैक्षणिक वातावरणाचा संदर्भ देत नाईट कॉलेजने वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धतीला आधुनिक अध्यापन पद्धतींची जोड देण्याचे आवाहन केले. अध्ययन-अध्यापनात नावीन्यपूर्ण उपक्रम, प्रयोग करून महाविद्यालयाचे वेगळेपण ठळक करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

22 AUG 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्य संपादन केल्यास भविष्य उज्ज्वल

• कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे प्रतिपादन



**जनप्रवास : कोल्हापूर**

साहित्य, संस्कृती, कला आणि क्रीडा हे सगळे घटक उदरनिर्वाहासाठी उपयुक्त आहेत. प्रत्यक्षात कौशल्य संपादन केल्यास निश्चित उज्ज्वल भविष्य आहे. याकरिता शास्त्रशुध्द माहिती असणे खूप गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभाग आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील सांस्कृतिक समन्वयकांना कलाप्रकारांची शास्त्रोक्त माहिती होण्यासाठी राजर्षी शाहू सभागृहामध्ये दोन दिवसीय 'लोककला आणि लोकनृत्य माहिती कार्यशाळेचे' आयोजन केले होते. त्यावेळी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून कुलसचिव डॉ. विलास शिंदे बोलत होते.

तद्नंतर, प्रथम सत्रामध्ये राजेश पंचे, सोलापूर यांनी तर द्वितीय सत्रामध्ये संदीप पाटील, मुंबई यांनी मार्गदर्शन केले. तृतीय सत्रामध्ये रामानंद उगले, जालना आणि कल्याण उगले, जालना तर चतुर्थ सत्रामध्ये डॉ.गणेश चंदनशिवे, मुंबई हे मार्गदर्शन करणार आहे. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावळीराम घाणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, शंतनु पाटील, श्रीमती एम.बी. पोतदार यांच्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हयातील महाविद्यालयांमधील सांस्कृतिक समन्वयक, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, पारंपरिक लोककला व लोकनृत्याचे जतन आणि संवर्धन करण्यासह प्रत्येक माणसापर्यंत पोहचविण्यासाठी विद्यापीठ विविध माध्यमातून प्रयत्न करीत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 AUG 2026
सकाळ

# साहित्य, संस्कृती हे उदरनिर्वाहासाठी उपयुक्त

## डॉ. व्ही. एन. शिंदे : विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २१ : साहित्य, संस्कृती, कला व क्रीडा हे सगळे घटक उदरनिर्वाहासाठी उपयुक्त आहेत. प्रत्यक्षात कौशल्य संपादन केल्यास निश्चित उज्ज्वल भविष्य आहे. याकरिता शास्त्रशुद्ध माहिती असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आज येथे केले.

विद्यापीठात विद्यार्थी विकास विभाग आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजर्षी शाहू सभागृहात लोककला आणि लोकनृत्य माहिती कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. राजेश पंचे, संदीप पाटील यांनी मार्गदर्शन केले. डॉ. नंदकुमार मोरे, शंतनू पाटील, एम. बी. पोतदार उपस्थित होते. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावळीराम घाणे यांनी स्वागत केले. डॉ. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. संगीत व नाटअयशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी आभार मानले. दरम्यान, कार्यशाळेत उद्या, शनिवारी रामानंद उगले, कल्याण उगले, गणेश चंदनशिवे मार्गदर्शन करणार आहेत.



डॉ. शिंदे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 AUG 2026
जनप्रवास

# 'पत्रकारितेमुळे अनोळखी जग पाहायला मिळाले'

**जनप्रवास : कोल्हापूर**

पत्रकारितेमुळे जे जग कधी पाहिले नव्हते, असे अनोळखी जग पाहायला मिळाले, असे प्रतिपादन 'पद्मश्री' पुरस्कार प्राप्त छायाचित्रकार सुधारक



ओलवे यांनी केले. जागतिक छायाचित्र दिनानिमित्त 'साहित्य आणि ललित कला' या विषयावर मराठी विभागात बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे होते, तर प्रमुख उपस्थितीत डॉ. नंदकुमार मोरे होते.

ओलवे म्हणाले, भौतिक जगाच्या पलीकडचे आणखी एक जग आपल्या आवतीभोवती वावरत असते. त्याकडे डोळेझाकपणा करणे म्हणजे आपल्याशी प्रतारणा करण्यासारखे असते. त्या जगाकडे डोळसपणे पाहण्याच्या आंतरिक गरजेतून मी छायाचित्रणाकडे वळलो. म्हणून माणूस हा माझ्या छायाचित्रणाचा केंद्रबिंदू आहे. त्यासाठी माणसाच्या डोळ्यात बघितले की, कोणत्याही परवानगीची गरज लागत नाही. यातूनच दीर्घकाळ टिकणारे काम करण्याची ऊर्मी मिळाली. अध्यक्षस्थानावरून डॉ. शिंदे, सुभाष पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. ज्योती वराळे यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले. यावेळी डॉ. धनंजय देवळलकर, सोनाली जाधव, अवधूत गंगाधर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 AUG 2026
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त शांती व अहिंसेची शपथ घेऊन शिवाजी विद्यापीठात गुरुवारी सद्भावना दिन साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. कबीर खराडे यांनी उपस्थितांना सद्भावना शपथ दिली. या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार, विधी अधिकारी अनुष्का कदम उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 AUG 2026

सकाळ

# विद्यापीठात सद्भावना दिन

कोल्हापूर : भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त शांती व अहिंसेची शपथ घेऊन शिवाजी विद्यापीठात आज सद्भावना दिन झाला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. कबीर खराडे यांनी उपस्थितांना सद्भावना शपथ दिली. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार, विधी अधिकारी अनुष्का कदम उपस्थित होते.